


RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784




वर्ष ३ रे अंक : १७० वा मंगळवार दि. १९ ऑगस्ट २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# भ्रष्ट मंडळ अधिकारी विजय टेकाळे सेवेतून बडतर्फ का होईना!

## तुकडेबंदीचे उल्लंघन, अनोंदणीकृत ५० फेरफार केले मंजूर!

# ज्येष्ठ पत्रकार कायस्थ यांची महसूल मंत्री यांना तक्रार!

**जनसंचलन/ बुलढाणा**

खाबुगिरी करणारे मंडळ अधिकारी विजय टेकाळे यांनी सातगाव म्हसला येथे कार्यरत असताना, तुकडेबंदीचे उल्लंघन करून बेकायदेशीर अनोंदणीकृत वाटणीपत्राचे ५० फ ेराफार मंजूर केल्याने विजय दत्तात्रय टेकाळे यांना कायद्यानुसार बडतर्फ करण्याची मागणी तक्रारदार तथा ज्येष्ठ पत्रकार जितेंद्र कायस्थ यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना केली आहे. तक्रारदार कायस्थ यांच्याकडे अनेक पुरावे आहेत.परंतु जिल्हाधिकारी यांना ७ वेळा तक्रारी करून देखील संबंधित यंत्रणा या भ्रष्टाचारी अधिकाऱ्याला का वाचवत आहे? हा प्रश्न उपस्थित झाला आहे.सध्या हिवरा आश्रम मेहकर येथे कार्यरत असलेल्या विजय टेकाळे यांनी म्हसला बु.येथे कार्यरत असताना,चांडोळ भाग एक व दोन येथील तलाठ्याकडून तुकडेबंदीचे उल्लंघन करीत नियम धाब्यावर ठेवले व अनोंदणीकृत ५० फेरफार मंजूर केले.त्यामुळे शासनाचा मोठ्या प्रमाणात महसूल बुडाला.शासनाचा गलेलठ्ठ पगार मिळूनही भ्रष्टाचार करणाऱ्या या महाभ्रष्टाचारी विजय दत्तात्रय टेकाळे नावाच्या अधिकाऱ्यांवर २ वर्षांपूर्वीच कारवाईची मागणी केली होती. परंतु महसूल मधील काही चलाख अधिकारी शासनाच्या जाळ्यात कसे काय सापडत नाही? असा प्रश्न निर्माण झाला असल्याने, अधिकाऱ्यांवरील नागरिकांचा विश्वास उडत आहे. जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी सुद्धा या तक्रारीच्या अनुषंगाने साधी चौकशी सुद्धा केली नाही, याचे आश्चर्य व्यक्त होत आहे. जिल्हा यंत्रणेला पुरावे देऊनही कायद्याला पळवाटा असल्यामुळे पत्रव्यवहार करण्यातच वेळ मारून नेत आहेत,असे तक्रारकर्ते जितेंद्र कायस्थ यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे. तक्रारकर्त्यांचे म्हणणे आहे की, प्रत्येक भ्रष्टाचाराचे पुरावे केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव,महसूल मंत्री चंद्रकांत बावनकुळे,आयुक्त अमरावती,एसीबी अमरावती, बुलडाणा जिल्हाधिकारी,एसीबी बुलडाणा या सर्वांना पूर्ण पुरावे दिले आहेत परंतू जिल्हाधिकाऱ्यांकडून एसीबी कडून किंवा महसूल विभागाकडून या प्रकरणी चौकशीचे आदेश अद्याप पर्यंत देण्यात आले नाही किंवा तक्रारकर्त्याला कोणतेही पत्र व्यवहार नाही. टेकाळे नियमबाह्य केलेल्या कामातून करोडो रुपयांची चल अचल संपत्ती स्तत: हा व परिवारातील सदस्या नावे असून त्यांचे शेकडो सातबारे हे नावाचे प्रशासनाकडे दिले आहेत. तरी या भ्रष्टाचार संदर्भातील अहवाल अद्याप पर्यंत का दिले नसल्याची चौकशी कर्तव्यदक्ष




जिल्हाधिकारी यांनी त्वरित घ्यावी व संबंधित विभागाला सादर करण्याचे निर्देश देण्यात येण्याची मागणी तक्रारदार कायस्थ यांनी महसूलमंत्र्यांना कारवाई न झाल्यामुळे निवेदनाद्वारे केली आहे

---

### काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले...

## बेजवाबदार जिल्हाधिकारी किरण पाटील यांच्यावर भारतीय दंड संहिता नुसार कायदेशीर कारवाई करा

# जलसमाधी घेणाऱ्या आंदोलकाचे जिल्हाधिकाऱ्यांना सोयरे सुतक नाही,भेट सुद्धा घेतली नाही!

**जनसंचलन/बुलडाणा**

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी जिगाव प्रकल्पातील पुनर्वसन करण्यासाठी नदीत उडी घेऊन बलिदान दिलेल्या विनोद पवार यांच्या कुटुंबीयांना भेट दिली.यावेळी बेजवाबदार जिल्हाधिकारी किरण पाटील यांच्यावर भारतीय दंड संहिता नुसार कारवाई करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी रेटून धरली आहे.सरळ रस्ता वाकडा करण्याचे काम राजकारणी यांनी केलं असून, या विरोधात लढणारे सामाजिक कार्यकर्ते विनोद पवार यांचा राजकीय बळी गेला आहे, असा आरोप सपकाळ यांनी केला. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, जिल्हाधिकारी बेताल आहेत. शासनाच्या हातातील बाहुले असणाऱ्या व शासनाचा मोठा पगार घेणाऱ्या जिल्हाधिकाऱ्यांनी पवार कुटुंबियांची भेट घेतली नाही.ते वेडंवाकडं बोलतात..याचाही धिक्कार आहे. कुणी मंत्री देखील आले नाहीत.ही गंभीर घटना घडल्यामुळे प्रशासनाची ही जबाबदारी आहे.भारतीय दंड संहिता नुसार जिल्हाधिकारी यांच्यावर कारवाई व्हायला पाहिजे अशी मागणी सपकाळ यांनी केली आहे.





# निष्फळ चर्चेचा अर्थ...

## संपादकीय लेख

रशिया आणि युक्रेन यांच्यात गेल्या साडेतीन वर्षांपासून सुरू असलेले युद्ध आपणच संपविणार, अशी बढाई मारणारे ट्रम्प यांना प्रत्यक्षात पुतिन यांना युद्धविरामाच्या दिशेने नेण्यात अपयश आले आहे. मात्र, आपल्या अपयशाची कबुली न देता ट्रम्प यांनी शिखर परिषद उत्पादक ठरल्याचे सांगितले. युद्धबंदीचा करार होऊ न शकल्याचे मान्य करताना त्या दिशेने जाण्याची संधी असल्याचे त्यांनी नमूद केले. अमेरिकेतील अलास्का येथे झालेल्या या शिखर परिषदेत पुतिन यांचे ट्रम्प यांनी शाही स्वागत केले. अमेरिकेला आपला शेजारी म्हणत पुतिन यांनी या स्वागताचा स्वीकार केला; परंतु युद्ध थांबविण्याची कोणतीही हमी त्यांनी दिली नाही. त्यामुळे एक प्रकारे त्यांचा विजयच झाला. पुतिन यांची देहबोलीही विजयी



वीरासारखी होती. या शिखर परिषदेत नेमके काय झाले हे सध्या तरी गुलदस्तात आहे. ट्रम्प आणि पुतिन यांच्या संयुक्त पत्रकार परिषदेतून कोणताही तपशील बाहेर आलेला नाही. ट्रम्प-पुतिन यांच्या शिखर परिषदेकडे साऱ्या जगाचे, विशेषतः युक्रेनचे आणि युरोपीयन देशांचे लक्ष होते. ट्रम्प यांचा युद्धविरामाचा आग्रह पाहता पुतिन सांगतील त्या अटींवर ते युद्ध थांबविण्यास भाग पाडतील काय, अशी भीती युक्रेनला आणि युरोपीय देशांना होती. प्रत्यक्षात तसे न झाल्याने युक्रेनचे अध्यक्ष व्लाजिमिर झिल्येन्स्की यांनी सुटकेचा निश्वास सोडला असेल. मात्र, आता जबाबदारी युक्रेनची आणि युरोपीय देशांची असल्याचे ट्रम्प यांनी म्हटल्याने झिल्येन्स्की यांच्यासमोरील पेच कायम आहे. पुतिन यांच्याबरोबरील चर्चेचा तपशील झिल्येन्स्की यांच्यासह ङ्गनाटोफ देशांच्या प्रमुखांना सांगणार असल्याचे ट्रम्प यांनी म्हटले आहे. त्यानंतर कदाचित युद्धबंदी कशी होऊ शकते हे स्पष्ट होऊ शकेल. या शिखर परिषदेकडे भारताचेही लक्ष होते; कारण रशियाकडून तेल घेत असल्याने ट्रम्प यांनी भारतावर २५ टक्के अतिरिक्त आयातशुल्क लागू केले आहे. ट्रम्प-पुतिन चर्चा अनिर्णित राहिल्याने भारतासमोरील प्रश्न कायम आहेत. मात्र, भारताला रशियाचा तेल ग्राहक संबोधून आणि अतिरिक्त आयातशुल्कावर आता बोलणार नसल्याचे सांगून ट्रम्प यांनी याबाबत अनिश्चितता निर्माण केली आहे. त्यातून काय नेमके समोर येते हे पाहायला हवे. ट्रम्प आणि पुतिन यांच्यातील शिखर परिषदेतून हाती काही लागले नसले, तरी युद्ध थांबविण्याच्या दिशेने पावले पडली, हेही नसे थोडके. त्याचे स्वागत करायला हवे.

# रील स्टार महिलेचे फेक फेसबुक अकाउंटवरून महापुरुषाची बदनामी!

# सायबर पोलिसांनी केला भुसावळच्या आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल!

**जनसंचलन/बुलढाणा**



आरोपीने २७ जून रोजी सोशल मीडियावर आठ लाख फोलोअर्स असलेल्या जिल्ह्यातील एका महिलेचे फेक फेसबुक अकाउंट तयार करून महापुरुषांबद्दल बदनामीकारक व आक्षेपार्ह पोस्ट प्रसारित करून धार्मिक भावना दुखावल्या प्रकरणी आरोपी निलेश सुनील सोनार वय २६ रा.भुसावळ जि. जळगाव विरोधात सायबर पोलिसांनी कारवाई केली आहे. सदर आरोपीने जिल्ह्यातील रीलस्टार महिलेचे फेक फ ेसबुक अकाउंट तयार करून त्यावरून महापुरुषाबद्दल बदनामीकारक आणि आक्षेपार्ह पोस्ट प्रसारित केली. धार्मिक भावना दुखावल्यामुळे नेटकऱ्यांनी सदर रिल स्टार महिलेविरुद्ध टिकेची झोड उठवली होती. दरम्यान रील स्टार महिलेने बुलढाणा सायबर पोलीस ठाण्यात याप्रकरणी तक्रार दाखल केली. सायबर पोलिसांनी तपासचक्र फिरवून धार्मिक भावना भडकावणाऱ्या निलेश सुनील सोनार वय २६ रा.भुसावळ जि. जळगाव या आरोपीवर कलम २९९ बीएनएस आर/डब्ल्यू ६६ (सी) आयटी ॲक्ट प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांच्या मार्गदर्शनाखालीसायबर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रकाश सदगिर यांनी केली आहे

# कोलवडात कालभैरव कावड यात्रेचा जल्लोष!

**जनसंचलन/बुलढाणा**



रिमझिम पाऊस, सजलेले देखावे , कालभैरवाची भली मोठी मूर्ती त्यासमोर नंदी व त्यापुढे भक्ती भावे थीरकणारी तरूणाई असे दृश्य काल कावड यात्रेत दिसून आले. काल भैरव कावड यात्रेचे हे चौथी वर्ष होते. दरवर्षी तरुण वर्गाकडून ही यात्रा आनंदात उत्साहात साजरी केली जाते.बुद्धेश्वर ते कोलवड अशी ही कावड यात्रा निघाली. गर्द वनराईने नटलेल्या डोंगरातून रात्री बारा वाजता कावड यात्रेला सुरुवात झाली. खांद्यावर कावड घेऊन मोठा जमाव निघाला होता.ठिकठिकाणी कावड यात्रेचे स्वागत करण्यात आले. महिलांनी औक्षण केले तर काही ठिकाणी चहा फराळाची व्यवस्था करण्यात आली.१८ ऑगस्ट रोजी श्रावणाच्या चौथ्या सोमवारी हे आयोजन करण्यात आले. दुपार दरम्यान कोलवड येथे कावड यात्रा पोचली. २५ किलोमीटरचे हे अंतर तरुणाईने रात्रीच्या अंधारात पार केले. रिमझिम पावसात भक्ती भावे यात्रा यशस्वी पार पडली. या साठी कालभैरव कावड यात्रेचे समस्त पदाधिकारी,कोलवड ग्रामस्थानी विशेष परिश्रम घेतले.जय भोले शंकराचा गजर करीत कावड यात्रेचा समारोप करण्यात आला.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# विकसित व्हा!




बालयुवा दोस्तांनो! हाय! बालदिनाच्या शुभेच्छा! हॅपी चिल्ड्रेन्स डे! भारताचे ाजी पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांना बालकांविषयी वाटणा-या प्रेमाची आठवण म्हणून १४ नोव्हेंबर हा त्यांचा जन्दिवस बालदिनाच्या स्पात साजरा केला जातो. हा बालदिन बालकांना संदेश देतो, विकसित व्हा.

देशाती मुलांचे महत्त्व पाहता, देशाच्या उज्ज्वल भविष्यासाठी, त्यांची स्थिती सुधारण्यासाठी, ालदिन साजरा केला जातो. बालमजूर प्रतिंधक कायदा असूनही आर्थिक परिस्थितीमुळे किंवा अन्य कारणामुळे ब-याच ठिकाणी लहान मुले का करताना दिसतात. त्यामुळे या मुलांचा शिक्षणाचा प्रश्न, अनेक संस्था कार्यरत असूनही अद्याप सुटलेला नाही. या लहान मुलांची निरागसता जपायला हवी. त्यांच्याजवळ असलेल्या क्षमतेला वाव द्यायला हवा. जसे शक्य होईल, त्याप्रमाणे या बालकांना विकसित होण्याची संधी दिली पाहिजे.

बालयुवा दोस्तांनो, विकसित व्हा. विकसित होण्यासाठी तुम्ही प्रथम स्वतःचा शोध घ्या. व्यक्तित्त्व विकास अर्थात पर्सनॅलिटी डेव्हलपमेन्ट हा शब्द तुम्ही सर्व क्षेत्रात ऐकला असेल. विकासाच्या १०० पाय-या आहेत, त्यातील पहिल्या १५ पाय-या या शालेय शिक्षणाशी निगडित आहेत. त्या पाय-या महत्त्वाच्या असून प्रत्येकाने चढायलाच हव्यात. अभ्यासासोबत असलेल्या सहशालेय कार्यक्रमांतून अनेक क्षेत्रांतील दालनांची ओळख होते. त्यामागे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हाच उद्देश असतो. शालेय शिक्षणानंतरच्या ३० पाय-या तुच्यात कौशल्य निर्माण झाले आहे का? हे पाहण्यासाठी असतात. कामासाठी, ाहितीसाठी किंवा अन्य कारणांसाठी तुम्हाला लोकांशी संपर्क साधता आले पाहिजे, संवाद करता आला पाहिजे, कोणतीही अडचण, संकट आले असता सारासार विचार करून मार्ग काढता येणं, घरातील छोटी-मोठी कामे करणे, कोणतेही का नेटाने पूर्ण करणे ही झाली कौशल्य. अशीच अनेक दैनंदिन जीवनाला उपयोगी पडतील, अशी कौशल्ये किंवा स्वनिर्मिती करा आणि विकसित व्हा.

अनेक छोट्या-छोट्या टप्प्यांतून तुम्ही विकसित होत असता. त्याचं उदाहरण म्हणजे, हाविद्यालयातील अंतर्गत वर्गातील क्रिकेट सान्यात आमच्या वर्गातील संघाला चांगला खेळ करता आला नाही, दुस-या गटातील एकाने अचूक गोलंदाजी करीत आमच्या विकेट्स घेतल्या, म्हणून आम्ही निराश झालो. त्याचा त्यावेळेस रागही आला. काही काळ गेला, तसे दुःख शीतल झाले. काही हिन्यांनंतर जिल्हास्तरीय आंतर म हाविद्यालय स्पर्धेत त्याच खेळाडूने अचूक गोलंदाजी करून विजयश्री खेचून आणली. सामना संपल्यावर इतरांप्रमाणे मीही त्याला मिठी मारली. एका निवांत क्षणी मी स्वतःशीच हसलो. माझ्यात बदल झाला होता. माझा वर्ग पासून आमचे महाविद्यालय म्हणजेच मी पासून आमचे हा विस्तार प्रवास मी अनुभवत होतो. त्याहीपुढे, विरुद्ध गटातल्या खेळाडूचे खिलाडूवृत्तीने अभिनंदन करता आले पाहिजे, हे मी शिकलो. मन मोठं केलं. लहान-सहान गोष्टीत अडकून न राहता, सोडून द्यायला शिकलो. लहान वयात क्षुल्लक करणांवरून झालेली भांडणे, अशा अनेक चुका आज मी सुधारत आहे. समोरच्याची क्षमता आपल्यापेक्षा जास्त आहे, हे स्वीकारायला शिकलो. त्रिांनो, हेच विकसित होणं होय. ी सर्वत्र पाहाते, बालयुवा दोस्त जेथे जेथे जातात तेथे तेथे त्यांचे औत्सुक्य जागे होऊन लर्निंग प्रोसेस चालू होते; नव्हे ते व्हायलाच पाहिजे. सर्व थरांतील प्रत्येक माणसाकडून शिकण्यासारखे खूप आहे. प्रत्येकाकडे कुठले तरी कौशल्य असतेच, त्याचे कौतुक करा. कोणत्याही कारणानित्तिाने जेव्हा एकत्र येता, तेव्हा साद द्या, दाद द्या, मिठी मारा(हग करा), हस्तांदोलन करा, आदराने वागा हे सारे मनापासून अगदी सहजतेने घडायला हवे. अशामुळे तुम्ही लक्षात राहता. मैत्री होते, लोकसंग्रह वाढतो. हेच विकसित होणं होय. २०२०चा झी अॅवॉर्ड पाहताना संकर्षण क-हाडे या कलाकाराने, म ाझ्या या बक्षिसात श्रेयस तळपदेचा भाग आहे. त्यांनीही माझ्यासोबत हे पदक स्वीकारावे , असे बोलून त्यांना व्यासपीठावर बोलावले. नंतरच्या निवेदनात सांगितले, शूटिंगच्या पहिल्याच दिवशी त्यांनी मला मिठी मारून आपलेसे केले. नवीन आणि ज्येष्ठ यामधील भिंत तोडली, म्हणून माझा अभिनय नंतर फुलत गेला.

ज्येष्ठांनी नेहीच नवोदितांना हात द्यावा, ही शिकवण नव्हे, कृती म्हणजेच विकसित होणं होय. विद्यार्थ्यांनो, त्रि-परिवारात वावरत असताना, भिन्न संस्कृतीतील, भिन्न आर्थिक परिस्थितील सारे तुम्ही एकत्र येता. त्या वयातील औत्सुक्यानुसार, आपल्याकडील वस्तू बघायला देणं, जमेल तेथे सहकार्य करणे ही खरी त्री. अनेक नामांकित व्यक्ती बालपणातील सहकार्याचा किंवा प्राथमिक अवस्थेत धडपडत असताना त्रिांनी केलेल्या दतीचा आवर्जून उल्लेख करतात. पाहा, क्रिकेटर धोनीवरील चित्रपट ए. एस. धोनी.

सण उत्सवाला एकेकांच्या घरी जा. घराला, घरातील सदस्यांना नावे न ठेवता त्या घरातले होऊन राहा. एकोप्याने त्या घरात समरस व्हा. त्रिाच्या घरातील कोणत्याही अडचणीत हे मित्र एकमेकांना उपयोगी पडतात, हे मी सर्वत्र पाहाते. हेच विकसित होणं होय.

आमच्या लहानपणी पेन फ्रेंड याने पत्र-मैत्री होती. दिवाळी आणि मे महिन्याच्या सुट्टीत चार, आठ दिवस एकमेकांच्या घरी राहायला गेल्यावर ओळख व्हायची. करी मनोरंजन जो मुलांचे; जडेल नाते प्रभूशी तयांचे मुले म्हणजे देवाघरची फुले, असे मानणारे, मुलांवर अपरंपार माया करणारे ते साने गुरुजी. बालदिनाला त्यांची आठवण काढल्याशिवाय लेख पूर्ण होऊच शकत नाही. अध्यापक आणि स्वातंर्त्यसेनानी साने गुरुजींनी तुम्हा मुलांसाठी लिहिलेली पुस्तके वाचा आणि विकसित व्हा.

आज सर्वत्र वयाच्या चाळिशी, पन्नाशीनंतर शाळेतील आठवणी जगविण्यासाठी एक दिवस भेटीगाठीचा कार्यक्रम आखतात. ही गोष्टच बालपणाचे महत्त्व अधोरेखित करते. बालदिनाचा सर्वात मोठा संदेश म्हणजे बालपण जपाङ्क अन् बालपण जपता जपता विकसित व्हा!

# भूक मंदावणे, वजन घटणे हे कॅन्सरचे लक्षण असू शकते

कॅन्सरबाबत लोकांमध्ये जागरूकतेची गरज आहे. कारण जगात होणाऱ्या एकूण मृत्यूंमध्ये सर्वांत मोठे दुसरे कारण कॅन्सर आहे. डब्ल्यूएचओच्या अहवालानुसार, २०१८ मध्ये जगभरात कॅन्सरच्या १.८१ कोटी केसेस समोर आल्या असून, ९० लाख लोकांचा मृत्यू झाला आहे.भारताबाबत बोलायचे, तर येथे दरवर्षी सुमारे ११.५ लाख लोकांना कॅन्सर होत आहे. गंभीर बाब ही की, विकसित देशांपेक्षा येथे कॅन्सरपीडितांचा दर जवळपास दुप्पट आहे. ग्लोबल ऑंकोलॉजीच्या अहवालानुसार, २०२० मध्ये भारतात दर एक लाख पुरुषांमध्ये ९४; तर दर एक लाख महिलांमध्ये १०३.६ महिलांना कॅन्सरचा आजार आहे.कॅन्सरने होणाऱ्या सुमारे एक तृतीयांश मृत्यूंसाठी ५ प्रमुख कारणे मुख्यत्वे जबाबदार आहेत. यामध्ये स्थूलत्व, जेवणात फळे व भाज्यांचा कमी वापर, शारीरिक रूपाने निष्क्रिय होणे, तंबाखू व मद्यसेवन आहे. कॅन्सरने होणाऱ्या एकूण मृत्यूंमध्ये २२ % मृत्यू तंबाखूमुळे होत आहेत. पुरुषांमध्ये फुप्फुसाचा कॅन्सर; तर महिलांमध्ये ब्रेस्ट कॅन्सर सर्वाधिक होतात. युटिलिटी : कॅन्सरपासून वाचण्यासाठी ही दक्षता बाळगा

सावध व्हा जर...

वजन काही न करता घटले असेल तर : खाणेपिणे, दिनचर्या वा व्यायामात कोणताही बदल न करताही काहीच दिवसांत वजन ४ किलोपेक्षा जास्त कमी झाले असेल, तर सावध व्हा. स्वादुपिंड, पोट, फुप्फुसाच्या कॅन्सरमध्ये वजन वेगाने कमी होत असते.

जास्त थकवा जाणवत असेल तर : आपण तणावात असाल व नेहमीपेक्षा जास्त थकवा जाणवत असल्यास डॉटरांचा सल्ला घ्या. थकवा ब्लड कॅन्सरचे प्रारंभिक लक्षण असू शकते.प्रोस्टेट कॅन्सरच्या अॅडव्हान्स स्टेजमध्येही खूप थकवा जाणवतो.

सतत खोकला वा शरीरात वेदना असतील तर : सतत खोकला येत असेल वा छातीत दुखत असल्यास त्याकडे दुर्लक्ष करू नका. कारण ही फुप्फुसाच्या कॅन्सरची सुरुवातीची लक्षणे असू शकतात.खोकला, यूरिन, स्टूल, तोंड वा नाक यापैकी कोठूनही वारंवार र्नताचे अंश दिसत असल्यास ते सर्व्हायकल कॅन्सरचे लक्षण असू शकते. संपूर्ण शरीरात अनेक दिवस वेदना राहात असतील वा याचे कोणतेही प्रत्यक्ष कारण दिसत नसेल, तर हा हाडांच्या वा स्वादुपिंडाच्या कॅन्सरचे प्राथमिक लक्षण असू शकते.

शरीरावर डाग येत असतील तर : शरीरावर मोठे व वेगवेगळ्या रंगांचे डाग दिस लागल्यास सावध व्हा. तोंड वा जननांगावर दीर्घकाळपासून



जखम राहात असल्यास हेही कॅन्सरचे लक्षण असते. याशिवाय वारंवार लघवी होणे वा लघवीतील त्रासामुळे प्रोस्टेटचा आकार वाढणेही असू शकते.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# राज्यात ४ दिवस अतिवृष्टीचा इशारा; पुण्यासह या भागांत रेड अलर्ट....

**पुणे:** राज्यात रविवारी, पुढील २४ तासांसाठी पुणे घाट भागात रेड अॅलर्ट देण्यात आला असून पालघर, ठाणे, मुंबई शहर, मुंबई उपनगर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली या जिल्ह्यांत तसेच सातारा घाट, कोल्हापूर घाट या भागात ङ्कऑरेंज अॅलर्टफ देण्यात आला आहे. या कालावधीत जिल्हा प्रशासनाला सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्याचे राज्य आपत्कालीन कार्य केंद्राने कळवले आहे. भारतीय हवामान खात्याकडून १७ ते २१ दरम्यान अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला असून नागरिकांना सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच अतिवृष्टी इशाऱ्यामुळे भूस्खलनाची शक्यता असल्याने, सर्व आवश्यक कार्यवाहीसाठी जिल्हा प्रशासनांना कळविण्यात आले आहे. या




दरम्यान समुद्राची स्थिती खवळलेली असेल, तसेच ताशी ५०-६० किमी वारे वाहण्याची शक्यता असल्याने मच्छिमारांना समुद्रात न जाण्याच्या सूचना देण्यात आल्या असल्याचे राज्य आपत्कालीन कार्य केंद्राकडून कळविण्यात आले आहे.रायगड जिल्ह्यातील कुंडलिका नदीने इशारा पातळी ओलांडली आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील जगबुडी नदीने धोका पातळी ओलांडली असून खेड शहरातील जगबुडी नदीचे पाणी खेड - दापोली रस्त्यावर आल्याने खेड शहरातून दापोलीकडे जाणारी वाहतूक सुरक्षास्तव बंद करण्यात आली आहे. जळगाव जिल्ह्यातील हतनूर धरणातून तापी नदीपात्रामध्ये सद्यस्थितीत २८ हजार ७५ क्युसेक तसेच यवतमाळ जिल्ह्यातील इसापूर धरणातून पेनगंगा नदीपात्रात ५४ हजार ४६६ क्युसेक इतका विसर्ग सुरू आहे. प्रशासनातर्फे राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दल यांना आपत्कालीन परिस्थिती करिता सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या असल्याचे राज्य आपत्कालीन कार्य केंद्राकडून कळविण्यात आले आहे.मध्य भारतावर एक कमी दाबाचा पट्टा निर्माण होत आहे आणि याच्या प्रभावामुळे कोकण, मध्य महाराष्ट्र (प्रामुख्याने घाट परिसर), मुंबई महानगर प्रदेश, आणि मराठवाड्यात (प्रामुख्याने पश्चिम आणि दक्षिण भाग) १८ ते १९ ऑगस्टदरम्यान जोरदार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. यात प्रामुख्याने कोकणातील सर्वच जिल्हे; नाशिक, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, पालघर, ठाणे, उर्वरित मुंबई महानगर, सोलापूर, धाराशिव, आणि लातूर जिल्ह्यांचा काही भाग यांचा समावेश आहे. या दरम्यान खान्देश आणि उर्वरित मराठवाड्यातदेखील मध्यम ते जोरदार पावसाचा अंदाज आहे. तुलनेत विदर्भात हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस अपेक्षित आहे. या दरम्यान कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रातील घाट परिसरातील धरण साठ्यात वाढ होऊन नदी-नाल्यांना पूर येण्याची शक्यता आहे. तसेच काही प्रमाणात दरड कोसळणे, आणि सखल भागांमध्ये पूरस्थिती निर्माण होऊ शकते, ज्यामुळे नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन राज्याच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून करण्यात आले आहे

# गुजरातींच्या हाती मुंबई जाऊ न देण्याचे ठाकरे बंधूंचे टार्गेट; खासदार संजय राऊतांचे विधान

**मुंबई** : केंद्रीय मंत्री अमित शहा आणि त्यांच्या व्यापाऱ्यांचे मुंबई ताब्यात घेण्याचे जसे लक्ष्य आहे, तसेच ही मुंबई गुजरातींच्या हाती जाऊ न देण्याचे शिवसेना (उबाठा) व मनसेचे लक्ष्य आहे. मुंबई ही मराठी माणसाकडेच राहिली पाहिजेफ असे विधान शिवसेना (उबाठा) पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी शनिवारी केले.

उपमुख्यमंत्री शिंदे यांना मंत्रिपदाची लॉटरी लागल्याचे विधान वनमंत्री गणेश नाईक यांनी केले होते. या पार्श्वभूमीवर राऊत प्रसारमाध्यमांशी बोलत होते. ङ्कवास्तविक लॉटरी हा प्रतिष्ठित शब्द आहे. एकेकाळी सरकारदेखील लॉटरी चालवत होते. पण आता राज्यात बेकायदा मटका सुरू आहे. देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री असले तरीही आकडा लावला जात आहे. गणेश नाईक यांनी लॉटरी शब्द वापरला, पण त्यांच्या डोक्यात ङ्कमटकाफ हा शब्द असावा. मुख्यमंत्रिपदासाठी मटका लागला असावा, असे त्यांना म्हणायचे असावेफ असे ते म्हणाले. ङ्कमटक्याचे आकडे चंचल असतात. सकाळ, दुपार आणि रात्री असे वेगवेगळे आकडे निघतात. हे आकडे सांभाळता येत नाहीत आणि त्यातही यांच्या मटक्याचा आकडा काढणारा दिल्लीमध्ये बसला आहे. ते तिथे जाऊन आकडा लावण्याचा प्रयत्न करतात. पण सध्या यांचा आकडा लागत नाहीफ असेही राऊत म्हणाले.मंत्री गिरीष महाजन यांच्या विधानावरही राऊत यांनी प्रतिक्रिया दिली. ङ्कस्वत:च्या खाली काय जळतेय हे त्यांनी पाहावे. ज्या दिवशी त्यांच्याकडे सत्ता नसेल त्या दिवशी त्यांचे काय हाल असतील, ते कुठे असतील याचा त्यांनी विचार करावा. उद्या ठाकरे बंधू राजकीयदृष्ट्या एकत्र आल्यावर त्यांना कळेल. सध्या फडणवीसांच्या भोवती जे चोर-दरोडेखोर आहेत, त्यांना सत्ता नसल्यावर रस्त्यावर फिरणे कठीण होईलफ असे ते म्हणाले.विक्रोळी पार्कसाइट विभागात शनिवारी पहाटे दरड कोसळून झालेल्या दुर्घटनेत शालू व सुरेश मिश्रा यांचा जागीच मृत्यू झाला, तर आरती आणि ऋतुराज मिश्रा गंभीर जखमी आहेत. या दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेले हे स्थानिक लोकप्रतिनिधी, मुंबई महापालिका आणि म्हाडा प्रशासनाच्या निष्काळजीचे बळी आहेत, असा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस (शप) पक्षाने केला. पार्कसाइट परिसरात म्हाडा संरक्षण भिंत उभारणार असल्याचे महापालिका प्रशासनाने म्हटले होते. परंतु, आजपर्यंत त्या कामाचा मागमूसही नाही. लोकप्रतिनिधींकडूनही याबाबत कुठलाही पाठपुरावा करण्यात आला नाही. दरड दुर्घटनेतील मृत्यू हे त्यांच्या उदासीनतेचे बळी आहेत, असा आरोप राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे (शप) मुंबई अध्यक्ष अमोल मातेले यांनी या दुर्घटनेनंतर केला. दोन निरपराध जीव जाऊनही हे लोकप्रतिनिधी दहिहंडी उत्सवात रमले आहेत. मृतांच्या कुटुंबीयांना त्यांनी भेटही दिली नाही, असेही ते म्हणाले

# अष्टविनायक महामार्गावर ट्रक दुधाच्या टँकरमध्ये घुसला, एकाच कुटुंबातील तिघांचा मृत्यू...



**पुणे** : शिरुर तालुक्यातील कवठे येमाई (अष्टविनायक महामार्ग) परिसरात रविवार १७ ऑगस्ट रोजी पहाटे झालेल्या भीषण अपघातात अहिल्यानगर जिल्ह्यातील वडनेर (ता. पारनेर) येथील वाजे कुटुंबातील तिघांचा करुण अंत झाला. मृतांमध्ये ३८ वर्षीय ज्ञानेश्वर मकाजी वाजे, ६८ वर्षीय शांताबाई मकाजी वाजे आणि त्यांचा ५ वर्षीय मुलगा युवांश यांचा समावेश आहे.ज्ञानेश्वर वाजे हे आई व लहान मुलासह मुंबईहून दूध वाहतूक करणाऱ्या टँकरमधून आपल्या गावी जात होते. पहाटे सुमारास काळूबाई नगर येथील बंटी ढाब्याजवळ दुध टँकर (एमएच १६ सीडी ९८१९) हा मालवाहू ट्रकला (एमएच ४२ बी ८८६६) जोरदार धडकला. धडक इतकी भीषण होती की टँकर थेट ट्रकमध्ये घुसला.अपघाताचा मोठा आवाज ऐकून स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी जखमींना बाहेर काढून रुग्णालयात हलवले. मात्र, लहानगा युवांश घटनास्थळीच ठार झाला, तर गंभीर जखमी झालेल्या शांताबाई आणि ज्ञानेश्वर यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. टँकर चालक जखमी असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत. या दुर्दैवी अपघातामुळे वडनेर गावावर शोककळा पसरली आहे.दरम्यान, टाकळी हाजी पोलीस दूरक्षेत्राचे पोलीस उपनिरीक्षक दिलीप पवार यांनी कर्मचाऱ्यांसह घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला आहे. अष्टविनायक महामार्गावरील वाढत्या अपघातांमुळे हा मार्ग ङ्कमृत्यूचा सापळाफ ठरत असल्याची स्थानिकांची भावना असून, धोकादायक वळणांवर चेतावणी फलक व शास्त्रीय गतिरोधक बसवण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# बिगबॉसफेम गायकाने गायलं तेजश्री प्रधानच्या मालिकेचं शीर्षक गीत; २० वर्षात पहिल्यांदाच मिळाली संधी...

**मुंबई:** अभिनेत्री आणि अभिनेता सुबोध भावे यांची नवीन मालिका ११ ऑगस्टपासून झी मराठीवर सुरू झाली. वीण दोघांतली ही तुटेना असे या मालिकेचे नाव असून यामधील समर-स्वानंदीची जोडी प्रेक्षकांचे मन जिंकते आहे. झी मराठीच्या मालिका ज्याप्रमाणे चर्चेत येतात, त्याप्रमाणे या मालिकांच्या शीर्षक गीताचीही नेहमी चर्चा होते. या मालिकेचे पूर्ण शीर्षक गीत नुकतेच प्रदर्शित करण्यात आले. मराठी संगीत विश्वातील आघाडीच्या गायकांनी हे गाणे गायले आहे. अभिजीत सावंत आणि सावनी रवींद्र यांच्या आवाजात रेकॉर्ड करण्यात आलेले हे शीर्षक गीत सोशल मीडियावरही चर्चेत आले.इंडियन आयडॉलचा विजेता आणि बिग बॉस मराठी ५चा उपविजेता असणाऱ्या अभिजीत सावंतसाठी हे गाणं खूपच खास आहे. त्याने विविध अल्बम आणि चित्रपटांमधील गाण्यांच्या माध्यमातून प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य केले. मात्र, मालिकेसाठी त्याने पहिल्यांदाच गाणे गायले आहे. पहिलंवहिलं शीर्षक गीत असल्याने अभिजीतसाठी हे गाणं खूपच खास आहे.पहिलं ते नेहमीच खास असतं, त्यामुळे या गाण्याबद्दल बोलताना अभिजीत म्हणाला की, झी मराठी सारख्या वाहिनीसाठी एखादं शीर्षक गीत करणं, ही संधी खूप मोठी आहे. माझं पहिलंवहिलं मालिकेसाठीच टायटल ट्रॅक मी त्यांच्यासाठी करतोय ही गोष्ट माझ्यासाठी खास आहे. या इंडस्ट्रीत २० वर्ष पूर्ण करताना ही संधी मिळाली याचा आनंद आहे. हे गाणं येऊन अगदीच काही दिवस झाले आणि प्रेक्षकांनी त्याला दिलेलं प्रेम बघून खूप छान वाटतं. उत्तम शब्दबद्ध झालेलं गाणं आणि त्या गाण्याला योग्य न्याय देऊन ते गाणं ही जबाबदारी होती. असे असताना प्रेक्षकांनी दिलेलं प्रेम बघता आपल्याकडून काहीतरी नक्कीच उत्तम झालं याचं समाधान आहे. हे गाणं कायम आठवणीत राहील, असे अभिजीत म्हणाला.वीण दोघांतली ही तुटेना या मालिकेचं शीर्षक गीत



ए. व्ही. प्रफुल चंद्र यांनी संगीतबद्ध केलं असून या गाण्याचे बोल वैभव जोशीने लिहिले आहेत. खास बाब म्हणजे काही वर्षांपूर्वी झी मराठीवर गाजलेल्या खुलता कळी खुलेना या मालिकेच्या शीर्षक गीतामध्ये वीण दोघांतली ही तुटेना अशा ओळी होत्या. त्या ओळी वापरुनच नव्या मालिकेला शीर्षक देण्यात आले आहे.

# रघुजी भोसलेंची ऐतिहासिक तलवार आज मुंबईत

**मुंबई :** छत्रपती शिवाजी महाराजांची वाघनखे महाराष्ट्रात दाखल झाल्यानंतर आता मराठा सैन्यातील अग्रणी सरदार रघुजी भोसले यांची तलवार लंडनहून आज, सोमवारी मुंबईत दाखल होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या ऐतिहासिक तलवारीचा लोकार्पण सोहळा पार पडणार आहे. नागपूरकरच्या भोसले घराण्याचे संस्थापक आणि छत्रपती शाहू महाराजांच्या काळातील मराठा सैन्यातील महत्वाचे सरदार रघुजी भोसले यांची ही तलवार राज्य सरकारने नुकतीच लिलावात जिंकली होती. सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशीष शेलार आज सकाळी १० वाजता ती विमानतळ प्राधिकरणाकडून ताब्यात घेतील. त्यानंतर विमानतळावरील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला अभिवादन करून बाइक रॅलीसह चित्ररथावर विराजमान करून ही तलवार पु. ल. देशपांडे कला अकादमीमध्ये आणण्यात येईलसांस्कृतिक कार्य विभाग, पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय सांस्कृतिक कार्य संचालनालय, पु.ल. देशपांडे कला अकादमीतर्फे संध्याकाळी ६ वाजता ढ्ढसेना साहेब सुभा पराक्रम दर्शनफ सोहळा आयोजित करण्यात आला आहे. यात भोसले यांच्या ऐतिहासिक तलवार प्रदर्शनाचे उद्घाटन व लोकार्पण मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते होईल. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार यांच्यासह भोसले यांचे वंशज मुधोजीराजे भोसले याप्रसंगी उपस्थित राहणार आहेत. सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी, यांच्यासह स्थानिक खासदार अनिल देसाई, स्थानिक आमदार महेश सावंत यांनाही या कार्यक्रमाला



आमंत्रित करण्यात आले आहे. हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला असणार आहे.दरम्यान, सरदार भोसले यांच्या तलवारीसोबत १२ वारसा मानांकित गडकिल्ल्यांच्या माहितीचे प्रदर्शन १९ ते २५ ऑगस्टदरम्यान सकाळी ११ ते सायं ७ या वेळेत पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या कला दालनात सुरू राहणार आहे. ते सर्वांसाठी विनामूल्य असणार आहे.

# राजस्थानने सुरु केली तयारी, संजू सॅमसन च्या बदलत्यात धोनीच्या ३ शिलेदारांवर डोळा, कोण बनणार रॉयल?

**मुंबई:** आयपीएल २०२६ पूर्वी अनेक संघ खेळाडूंच्या बाबतीत मोठे निर्णय घेण्यासाठी सज्ज झाले आहेत. राजस्थान संघ या बाबतीत आघाडीवर असल्याचे दिसत आहे. राजस्थानचा कर्णधार संजू सॅमसनने संघ सोडण्याचा विचार केला आहे. आयपीएल २०२६ च्या लिलावापूर्वी रिलीज करण्याची किंवा दुसऱ्या संघात त्याची देवाणघेवाण करण्याची अधिकृत विनंती केली आहे. या विनंतीनंतर, राजस्थान रॉयल्सने इतर अनेक फ्रँचायझींशी चर्चा सुरू केली आहे.राजस्थान रॉयल्सचे मालक मनोज बडाले यांनी सॅमसनच्या बदल्यात काही निवडक खेळाडूंची नावे सुचवली




आहेत ज्यांना ते त्यांच्या संघात पाहू इच्छितो. रॉयल्सने कदाचित एखाद्या फ्रँचायझीसोबत व्यापार अंतिम केला असेल किंवा या दिशेने काम वेगाने सुरू आहे. सूत्रांनुसार, राजस्थानने सॅमसनच्या बदल्यात अष्टपैलू रवींद्र जडेजा किंवा फलंदाज ऋतुराज गायकवाड यांना चेन्नई सुपर किंग्जमधून घेण्याची इच्छा व्यक्त केली आहे. चेन्नई फ्रँचायझी या दोन्ही खेळाडूंना सोडण्यास तयार नाही. याशिवाय, रॉयल्सने सीएसकेचा अष्टपैलू खेळाडू शिवम दुबेवरही लक्ष केंद्रित केले आहे, जो यापूर्वी रॉयल्सचा भाग होता. परंतु सीएसकेने स्पष्ट केले आहे की ते त्यांच्या स्टार अष्टपैलू खेळाडूची देवाणघेवाण करणार नाही.चेन्नई सुपर किंग्जचे व्यवस्थापन त्यांच्या सध्याच्या संघात कोणतेही बदल करण्यास नाखूश असल्याचेही अहवालात म्हटले आहे. सॅमसनने आतापर्यंत राजस्थान रॉयल्ससाठी १४९ आयपीएल सामने खेळले आहेत, ज्यामध्ये त्याने दोन शतके आणि २३ अर्धशतकांसह एकूण ४०२७ धावा केल्या आहेत. तो या फ्रँचायझीचा सर्वाधिक धावा करणारा आणि रॉयल्ससाठी ४००० पेक्षा जास्त धावा करणारा एकमेव खेळाडू आहे.आयपीएल२०२५ च्या मेगा लिलावापूर्वी सॅमसनला १८ कोटी रुपयांना राखण्यात आले होते. त्याने ६७ सामन्यांमध्ये रॉयल्सचे नेतृत्व केले आणि ३३ सामन्यांमध्ये विजय मिळवला, जो या फ्रँचायझीच्या कोणत्याही कर्णधाराचा सर्वोत्तम विक्रम आहे. त्याच वेळी, ऋतुराज गायकवाडने चेन्नई सुपर किंग्जसाठी ७१ आयपीएल सामन्यांमध्ये २५०२ धावा केल्या आहेत. तो चेन्नईसाठी सर्वाधिक धावा करणारा चौथा खेळाडू आहे आणि आयपीएल २०२४ च्या आधी त्याला संघाचा कर्णधार बनवण्यात आले.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# रडत-रडत काँग्रेस सोडली, दोन महिन्यात शिंदेंनाही जय महाराष्ट्र, महिला नेत्याचा नवा पक्ष ठरला




**नाशिक** : शिवसेना एकनाथ शिंदे गटाला अवघ्या दीड-दोन महिन्यांतच सोडचिठ्ठी देणाऱ्या ज्येष्ठ माजी नगरसेविका डॉ. हेमलता पाटील यांनी आता राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटात प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आहे. सोमवारी किंवा मंगळवारी त्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करणार असून पाटील यांनीही या वृत्तास दुजोरा दिला आहे.नोव्हेंबर २०२४ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसच्या तिकिटावर महाविकास आघाडीकडून लढण्यास त्या इच्छुक होत्या. परंतु, नाशिक मध्य मतदारसंघातून उमेदवारी न मिळाल्याने त्यांनी जाहीरपणे नाराजी व्यक्त केली. तिकीट न मिळाल्याने त्यांना माध्यमांशी संवाद साधतानाच अश्रू अनावर झाले होते. त्यानंतर सर्व पदांचा राजीनामा देत त्यांनी काँग्रेसचा हात सोडला. त्यावेळी पाटील काँग्रेसच्या प्रवक्तेपदी होत्या.त्यानंतर हेमलता पाटील यांनी फेब्रुवारी २०२५ मध्ये शिवसेना एकनाथ शिंदे गटात प्रवेश केला. परंतु, तेथेही त्यांचे मन रमत नव्हते. त्यामुळे दीड-दोन महिन्यांतच त्यांनी पक्ष सोडण्याचा निर्णय घेतला. त्याचवेळी आपण सध्या कोणत्याच पक्षात काम करणार नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले होते.शिवसेना शिंदे गटाला राम राम ठोकून चार महिने उलटले. आता पुन्हा हेमलता पाटील यांनी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटात प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आहे. आज, सोमवारी १८ किंवा उद्या, मंगळवारी १९ ऑगस्ट रोजी त्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करणार आहेत. आता आगामी महापालिका निवडणुकीत पाटलांच्या प्रवेशाने राष्ट्रवादीला नाशकात बळ मिळण्याचे संकेत आहेत

## तुझे अनैतिक संबंध आहेत, मला तलाक दे; पुण्यात भर चौकात मोठा राडा...

**पुणे** : पुण्यातून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. तलाक का देत नाही म्हणत २२ वर्षीय तरूणीला जीवे मारण्याचा भरसकाळी प्रयत्न केला. सुदैवाने ता या हल्ल्यातून बचावली. मात्र ती गंभीर जखमी झाली आहे. थेरगाव येथील एम. एम. चौकात हा सर्व प्रकार घडला. एका २२ वर्षीय तरुणीवर तिच्या पतीने तलाक न दिल्याच्या रागातून ब्लेडने वार करून खुनी हल्ला केला. ही घटना थेरगाव येथील एम. एम. चौकात शनिवारी (१६ ऑगस्ट) सकाळी १० वाजण्याच्या सुमारास घडली. सलमान रमजान शेख (वय २९, रा. रोहन वाइन्समागे, विजयनगर, काळेवाडी) आणि हुजेफा आबेद शेख (२७, रा. फिनोलेक्स कॉलनी, काळेवाडी, मूळ रा. वाहेगाव, ता. गेवराई, जि. बीड) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहे. या प्रकरणी नाणेकर चाळ, भारतनगर, पिंपरी येथील २२ वर्षीय महिला गंभीर जखमी झाली. तिने याबाबत काळेवाडी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. जखमी महिलेवर सध्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी महिला कामावर असताना आरोपी दुचाकीवरून घटनास्थळी आले. आरोपी सलमानने तलाक का देत नाहीस, या कारणावरून फिर्यादीचे कामावरील सहकाऱ्यांबरोबर अनैतिक संबंध असल्याचा संशय घेऊन तिच्या गळ्यावर आणि हातावर ब्लेडने वार केले. प्रतिकार करताना तिच्या डोक्यावर, गालावर आणि कानामागेही वार करून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला.

# चंद्रपूर, बुलढाण्यात पूर! इसापूर, सातनाला धरणाचे दरवाजे उघडले; अनेक मार्ग ठप्प...

**चंद्रपूर:** विदर्भातील बुलढाणा, यवतमाळ आणि चंद्रपूर जिल्ह्यात दमदार पावसामुळे पूरपरिस्थिती निर्माण झाली आहे. बुलढाण्यातील डोणगावात अतिवृष्टी झाल्याने कांचनगंगा नदीला पूर आल्याने मुंबई-नागपूर वाहतूक तीन तास थांबली होती. यवतमाळ आणि तेलंगणमधील अदिलाबाद जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे पुसद तालुक्यातील इसापूरचे १३पैकी नऊ व तेलंगणच्या अदिलाबाद जिल्ह्यातील जैनत मंडळातील सातनाला धरणाचे चार पैकी तीन दरवाजे शनिवारी उघडण्यात आले. परिणामी यवतमाळ, अदिलाबादसह चंद्रपूर जिल्ह्यातील कोरपना आणि चंद्रपूर तालुक्यातील पैनगंगा व वर्धा नदीच्या काठावरील गावात पूर आला आहे. अनेक मार्गांवरील पुलांवरून पाणी वाहत असल्याने वाहतूक ठप्प पडली.कोरपना तालुक्याला चंद्रपूरशी जोडणाऱ्या वर्धा नदीवरील धानोरा-भोयगाव मार्गावरील शनिवारी सायंकाळी नऊ वाजताच्या सुमारास पुलावर पाणी आल्याने वाहतूक ठप्प पडली. पुलाच्या दोन्ही बाजूला वाहनाच्या लांबच लांब रांगा लागल्या. पैनगंगा नदीला आलेल्या पुरामुळे तालुक्यातील कोडशी बुज-कोरपना, कोडशी बुज-कोडशी खुर्द मार्ग तर यवतमाळ जिल्ह्याला जोडणारे गांधीनगर-तेजापूर, जेवरा-गाडेघाट, पिंपरी-मूर्ती, परसोडा-पिपरड, देऊरवाडा आदी मार्ग बंद पडले



होते. वर्धा नदीला आलेल्या पुरामुळे चंद्रपूर, कोरपना, भोयगाव, इरई, कवठाळा, मारडा, पेलोरा गावांची बससेवा बंद होती. या गावांतील प्रवाशांना राजुरा-सास्ती मार्गे प्रवास करावा लागला.

# अतिवृष्टी, पुरामुळे होणाऱ्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करण्याचे

## मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांचे निर्देश...

**जनसंचलन/बुलडाणा**

राज्यात सध्या पावसाचा जोर वाढला असून हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार पुढील काही दिवसही पावसाचा जोर कायम राहणार आहे. अतिवृष्टी आणि यामुळे निर्माण होणाऱ्या पूर परिस्थितीमुळे राज्यात शेत पीक, फळ बागांचे नुकसान झाल्यास संबंधित जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी नुकसानीचे तातडीने पंचनामे करून त्याचा अहवाल विनाविलंब सादर करावा, असे निर्देश मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी दिले आहेत मदत व पुनर्वसन मंत्री श्री. जाधव-पाटील यांनी सांगितले, भारतीय हवामान विभागाने विदर्भ, मराठवाडा, कोकण या भागात पुढील चार दिवस अतिवृष्टीचा इशारा दिला आहे. प्रशासनाने या भागातील नागरिकांना तातडीने मदत उपलब्ध करून देण्यासाठी सर्तक रहावे. मदत व पुनर्वसन मंत्री श्री. जाधव-पाटील यांनी सांगितले, शासन त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या घटकांना त्वरित मदत व दिलासा मिळावा यासाठी प्रशासनाने अतिवृष्टी, पुरामुळे बाधितांचे तातडीने पंचनामे करावेत. या नुकसानीचा अहवाल संबधित विभागीय आयुक्तांमार्फत शासनास सादर करावा, असेही मदत व पुनर्वसन मंत्री श्री. जाधव-पाटील यांनी. सांगितले.

# नैसर्गिक आपत्तीमुळे मृत्यू उणे प्राधिकार पत्रावर निधी आरहित करण्यास मान्यता...

**जनसंचलन/बुलढाणा**

राज्यात नैसर्गिक आपत्तीत नागरिकांचा मृत्यू झाल्यास त्यांच्या कुटुंबीयांना तात्काळ मदत मिळावी, जखमी नागरिकांना मदत मिळावी यासाठी शासनाने उणे (-) प्राधिकार पत्रावरून रक्कम आरहित करण्याबाबत यापूर्वीच परवानगी दिली आहे. त्यानुसार संबधित जिल्हाधिकाऱ्यांनी नैसर्गिक आपत्तीमुळे बाधितांना मदत देण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही तातडीने करावी, असे निर्देश मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी दिले आहेत. मंत्री श्री. जाधव पाटील यांनी सांगितले, अतिवृष्टीमुळे घरांची पडझड, घरे पूर्णपणे बाधित किंवा अंशतः बाधित झाल्यास त्याचेही तातडीने पंचनामे करून त्यांना मदत देण्यात यावी. तसेच टपरीधारक, छोटे व्यावसायिक यांचे नुकसान झाल्यास अशा बाधितांचे तातडीने पंचनामे करून या बाधितांना जलद मदत देण्यात यावी. ही मदत त्यांना तातडीने मिळावी यासाठीही शासनाने उणे (-) प्राधिकार पत्रावरून रक्कम आरहित करण्यास शासनाने या पूर्वीच परवानगी दिली आहे. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार गेल्या दोन ते तीन दिवसा पासून सुरू असलेल्या अतिवृष्टी व पुरामुळे झालेल्या घरांच्या नुकसानीचे, जनावरांचे, मनुष्यहनी मुळे बाधितांना तत्काळ मदत मिळावी त्यांना दिलासा देण्याचे प्रशासनाने काम करावे. तसेच या बाधितांना शासन निकषानुसार मदत करावी, असेही मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील निर्देश दिले आहेत.

# ऑपरेशन सिंदुर सन्मान महारक्तदान शिबिरात ५७५ बॉटल विक्रमी रक्तसंकलन






**जनसंचलन/बुलडाणा**

राज्य उतपादन शुल्क, बुलढाणा विभाग व देशी विदेशी लिकर असोशिएसनमार्फत दि.१५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनी सहकार विद्या मंदीर सभागृह येथे ऑपरेशन, सिंदुर सन्मान महारक्तदान शिबीराचे भव्य आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिरात ५७५ बॉटल इतके विक्रमी रक्तसंकलन करण्यात आले. हे रक्तदान शिबीर अधीक्षक डॉ. पराग नवलकर यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन जिल्ह्याचे पालकमंत्री मा. मकरंद पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आमदार धीरज लिंगाडे, संजय गायकवाड, आमदार श्वेता महाले, जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, पोलीस अधीक्षक निलेश तांबे, उपवनसंरक्षक सरोज गवस, माजी आमदार विजयराज शिंदे, बुलढाणा अर्बन पतसंस्थाचे संस्थापक अध्यक्ष राधेश्याम चांडक, अध्यक्ष कोमल सुकेश झंवर, सामाजिक कार्यकर्ते रविकांत तुपकर, ॲड. जयश्री शेळके, ॲड. नाझेर काझी, अधीक्षक डॉ. पराग नवलकर आदी मान्यवर उपस्थित होते. या महारक्तदान शिबीराचे उदघाटक जिल्हाचे पालकमंत्री ना.मकरंद पाटील, प्रमुख पाहुणे आमदार संजय गायकवाड यांनी या रक्तदान शिबीर आयोजनाबाबत राज्य उत्पादन शुल्क, विभागाचे कौतुक केले. तसेच पुढेही ही परंपरा कायम राहील यासाठी शुभेच्छा दिल्या. या महारक्तदान शिबिरात रक्त संकलित करण्याकरिता शासकीय रक्तपेढी बुलढाणा, शासकीय रक्तपेढी शेगांव , शासकीय रक्तपेढी खामगांव, लिलावती रक्तपेढी, बुलढाणा, जनकल्याण रक्तपेढी, जालना, दत्ताजी भाले रक्तपेढी, छत्रपती संभाजी नगर, डॉ. हेडगेवार रक्तपेढी, अकोला इत्यादी रक्तपेढीकडून रक्त संकलनाची जबाबदारी पार पाडण्यात आली. यावेळी सामाजिक कार्यकर्त्या ॲड. जयश्री शेळके यांनी या शिबीरात आपले मत व्यक्त केले आहे. राज्य उतपादन शुल्क अधीक्षक डॉ. पराग मो. नवलकर यांनी शिबीरास प्रत्यक्षपणे सहकार्य करणा-यांचे तसेच रक्तदाते आणि देशी विदेशी लिकर असोशिएसनचे आभार व्यक्त केले. या महारक्तदान शिबीराचे प्रास्ताविक करतांना डॉ. पराग नवलकर यांनी शिबीराविषयी माहिती दिली. या शिबीराचे सूत्रसंचालन राज्य उत्पादन शुल्कचे दुय्यम निरीक्षक रमेश विठोरे, यांनी केले असून तसेच जिल्ह्यातील विविध विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांनी सुध्दा या महारक्तदान शिबीरास उपस्थिती दर्शवून रक्तदान करुन सेवाकार्यात सहभाग नोंदविला. डॉ. पराग मोरेश्वरराव नवलकर यांनी यापूर्वीसुध्दा राज्य उत्पादन शुल्क, विभागाच्या वतीने यवतमाळ, वाशिम, अहिल्यानगर, जालना या जिल्ह्यात रक्तदान शिबीर राबविले असून आतापर्यंत एकूण ८५८६ बॉटल इतके विक्रमी रक्तदान संकलनाचा यशस्वी विक्रम केलेला आहे. तसेच बुलढाणा येथे सुध्दा ५७५ बॉटल इतके विक्रमी रक्तदान संकलन झालेले आहे. असे एकूण ९१६१ बॉटल इतके विक्रमी रक्तसंकलन झालेले आहे. माझ्या ३५ वर्षाच्या कारकिर्दीमध्ये राज्य उत्पादन शुल्क, विभागाने रक्तदान शिबीर राबविण्यासारखे महान कार्य करण्याचे प्रथमतः बघत आहे. व अशा कार्यक्रमाला आमच्या शुभेच्छा आहेत व यापुढे. सुध्दा असे कार्यक्रम या विभागामार्फत होत राहोत यासाठी शुभेच्छा देतो. ना.मकरंद पाटील, पालकमंत्री, बुलढाणा.

# जिल्ह्यात अतिवृष्टीचा इशारा यंत्रणा सतर्क ठेवा

## केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या जिल्हाधिकाऱ्यांना सूचना

**जनसंचलन/बुलढाणा**




हवामान खात्याने दिलेल्या अंदाजानुसार अतिवृष्टीचा धोका लक्षात घेता आपत्ती व्यवस्थापन विभागाचे पथक सतर्क ठेवण्याच्या आणि नदीकाठच्या गावांवर विशेष लक्ष ठेवण्याच्या सूचना केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिल्या. बुलढाणा जिल्ह्यामध्ये गेल्या दोन दिवसापासून पाऊस सुरू आहे. हवामान खात्याने अतिवृष्टीचा इशाराही दिला असून अतिवृष्टी धोका लक्षात घेता सकाळीच केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी बुलढाण्याचे जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून जिल्ह्यातील पाणी परिस्थितीची माहिती जाणून घेतली. हवामान खात्याचा इशारा लक्षात घेता परिस्थितीनुसार शाळांना सुट्टी द्यावी व विद्यार्थी शाळेत आलेले असतील तर त्यांना सुखरूप घरी सोडण्याची व्यवस्था करण्यात यावी, या संदर्भात संबंधित विभागातील गटविकास अधिकारी व तहसीलदारांना सूचित करावे. आपत्ती विभागाचे पथक ही अलर्ट मोडवर ठेवावेत, नदीकाठच्या गावाकडे विशेष लक्ष ठेवाण्याच्या सूचना त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिल्या. अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे. सलग दोन दिवसांपासून जिल्ह्याच्या विविध भागात पावसाची संततधार आहे. धरणातील पाणीसाठा वाढल्यास जवळील गावांना सतर्कतेचा इशारावजा सूचना दिल्या जात आहेत. हवामान खात्याच्या इशाऱ्यानुसार जिल्हा प्रशासनाने यंत्रणा सज्ज ठेवल्या आहेत,फक्त अशी माहिती जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिली.

# हिरवे स्वप्न गेले वाहून..!

जनसंचलन/बुलढाणा

गेल्या तीन दिवसात ७३ बाधित गावातील ९०२ हेक्टर पिक उध्वस्त! बुलढाणा ( हॅलो बुलढाणा ) जिल्ह्यात बारा महसूल मंडळात अतिवृष्टी झाली असून सर्वाधिक देऊळगाव राजा तालुक्यातील ६४ तर सिंदखेडराजा तालुक्यातील नऊ अशी एकूण ७३ गावे बाधित झाली आहे.त्यामुळे ९०२ हेक्टर क्षेत्रावरील शेती पिके उध्वस्त झाली आहे.१४ ते १७ ऑगस्ट दरम्यानच्या नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झाल्याचा हा प्राथमिक अहवाल आहे. गेल्या दोन-तीन दिवसापासून पावसाने धुमाकूळ घातला आहे.नदी नाल्यांना पूर आला तर शेतात पाणी शिरल्याने शेताला तलावाचे स्वरूप प्राप्त झाले आहे.देऊळगाव राजा येथील ६४ गावे बाधित झाली तर ४५० हेक्टर क्षेत्र पिक भुईसपट झाले. सिंदखेडराजा तालुक्यातील ९ गावे बाधित झाली असून ४५२ हेक्टर वरील पिकांवर पाणी फेरले गेले. तीन दिवसात एकुण ९०२ हेक्टर क्षेत्रावरील सोयाबीन, कपाशी,तूर ही पिके पाण्यात बुडाल्याने शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे.




# यंदा बैलपोळा गोठ्यातच होणार साजरा!...

जनसंचलन/ देऊळगाव राजा



बैलांप्रति कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस म्हणजे बैलपोळा ! या दिवशी शेतकरी, पशुपालक आपल्या गायी, बैलांना आंघोळ घालून सजवून त्यांची गावोगावी मिरवणूक काढतात. यंदा मात्र जिल्हाधिकारी यांच्या आदेशामुळे बैलांची मिरवणूक काढता येणार नाही. यंदा शेतकऱ्यांना आपल्या सर्जा-राजाला सजवून गोठ्यातच पूजा करावी लागणार आहे. कारण लम्पी चर्मरोगाचा प्रादूर्भाव वाढण्याची शक्यता असल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे. या महिन्यात २२ तारखेला बैलपोळा आहे. मात्र जिल्ह्यात लम्पी चर्मरोगाच्या संसर्गामुळे जनावरांच्या मिरवणूक, यात्रा, बाजार आणि वाहतुकीवर बंदी घालण्यात आली आहे. बैलपोळा सणाच्या दिवशी शेतकरी, पशुपालक आपल्या बैलांची सजवून गावोगावी वाजतगाजत मिरवणूक काढतात. मात्र, यंदा लम्पीच्या प्रादुर्भावामुळे जनावरांच्या मिरवणुकीवर बंदी घालण्यात आली असल्याने यंदाच्या पोळा सणावर लम्पीचे सावट आहे. यामुळे शेतकऱ्यांना आपल्या सर्जा-राजाला सजवून गोठ्यातच पूजा करावी लागणार आहे. लम्पीला रोखण्यासाठी पशुसंवर्धन विभागाच्या डॉक्टरांकडून अनेक उपाययोजना करण्यात येत आहेत. मात्र ढगाळ वातावरण, डासांचा प्रादुर्भाव यामुळे लसीकरण झालेल्या जनावरांमध्ये लंपीचे प्रमाण वाढत असल्याचे दिसते. यामुळे जिल्हाधिकारी यांनी १८ ऑगस्टला आदेश काढून पोळा गोठ्यातच साध्या पद्धतीने साजरा करावा,पशुधन सार्वजनिक ठिकाणी नेऊ नये, असे सांगितले आहे. आदेशाचे उल्लंघन झाल्यास संबधित दोषींवर कारवाई करण्यात येईल असेही निर्गमित केलेल्या आदेशात म्हटले आहे.

# पशुधन चोरणाऱ्या आंतरजिल्हा टोळीच्या मुसक्या आवळल्या!

## एलसीबीने ५ लाख ५५ हजार रुपयांचा मुद्देमाल केला जप्त!

जनसंचलन/ बुलढाणा



स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पशुधन चोरणाऱ्या अंतर जिल्हा गुन्हेगारांच्या टोळीला गजाआड केले आहे. गुन्हेगारांनी १० गुन्ह्यांची कबुली दिली असून, पोलिसांनी इनोव्हा कारसह मोबाईल असा एकुण ५ लाख ५५ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे,आपण पोलीस अधीक्षक श्रेणिक लोढा, अमोल गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखालीस्थागुशाचे पोलीस निरीक्षक सुनील अंबुलकर यांच्या नेतृत्वातील पथकाने विशेष नाकाबंदी करून ही कारवाई केली. आरोपी शेख रशीद शेख शफी वय ४५ रा. धूळे,शेख नदीम शेख जाबीर वय २४ रा.सिल्लोड, सय्यद मोईन सय्यद अजीम वय २५ रा.सिल्लोड, मोहम्मद कुरबान मोहम्मद अजीज वय ३५ रा.धूळे, शेख समीर शेख खलील वय २८ रा. सिल्लोड या टोळीला जेरबंद केले आहे. चिखली येथील गोपाल साखरकर यांनी गोठ्यातील गाय चोरी गेल्याची फिर्याद दिली होती.दरम्यान स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तपासचक्र फिरविले असता त्यांना जनावरे चोरणाऱ्या आरोपीची माहिती मिळाली.जाफ्राबाद रोडवर नाकाबंदी करून आरोपींना ताब्यात घेण्यात आले.पोलिसी खाक्या दाखविला असता, गुन्हेगारांनी १० गुन्ह्यांची कबुली दिली असून आरोपींकडून इनोव्हा कारसह मोबाईल असा एकुण ५ लाख ५५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे

# खडकपूर्णात ९३ टक्के जलसाठा,११ वक्रद्वार उघडले!



जनसंचलन/बुलढाणा

अतिवृष्टीने जिल्ह्यातील मोठे जलप्रकल्प खळखळून वाहत आहेत. खडकपूर्णात ९३ टक्के जलसाठा असून आज ११ वक्रद्वार उघडले आहे. पेनटाकळी प्रकल्पात ८८ टक्के जलसाठा असून ९ गेट उघडल्याने नदी काठावरील गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. जिल्ह्यात मोठ्या प्रकल्पापैकी खडकपूर्णा आणि पेनटाकळी प्रकल्पक्षेत्रात कोसळधार पाऊस झाल्याने आज देऊळगाव राजा हद्दीतील खडकपूर्णा प्रकल्प ९३ टक्के भरला असून या प्रकल्पाचे ११ वक्र द्वार ५० सेंटीमीटरने उघडण्यात आले आहे. प्रकल्पातून २६५५९ क्युसेक इतका पाण्याचा विसर्ग नदीपात्रात सोडण्यात येत आहे. तर मेहकर तालुक्यातील पेनटाकळी प्रकल्पात ८८ टक्के जलसाठा उपलब्ध झाला असून या प्रकल्पाचे आज सकाळी ९ वक्र दरवाजे ३० सेंटीमीटरने उघडण्यात आले आहे. या प्रकल्पातून ६४८२ क्युसेक पाण्याचा विसर्ग नदीपात्रात सोडण्यात येत आहे. त्यामुळे नदीकाठच्या गावांना पूर नियंत्रण कक्षाकडून सतर्कतेचा इशारा देण्यातआलाआहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====

संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८